## अभ्यासक्रम प्रवेश-पात्रता व प्रक्रिया

**प्रथम वर्ष बी.ए./बी.एस्सी :**

**१) पात्रता :**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची एच.एस.सी. (१२ वी) अगर तत्सम परीक्षा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.ए./ एफ.वाय.बी.एस्सी वर्गात प्रवेश देण्यात येईल.

डी.एड. पदवी अभ्यासक्रम १२ वी कला शाखेसह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.ए. व डी.एड. पदवी अभ्यासक्रम १२ वी विज्ञान शाखेसह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.एस्सी. किंवा एफ.वाय.बी.ए या वर्गात प्रवेश घेता येईल. सदर विद्यार्थ्यास शैक्षणिक पात्रतेसाठी संबंधीत बोर्डाकडील स्थानांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) सादर करणे आवश्यक राहील.

एफ.वाय.बी.एस्सी. या वर्गाला प्रवेशासाठी विद्यार्थी पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित यापैकी कोणतेही तीन व इंग्रजी विषय घेऊन दोन स्तरावरील एच.एस.सी. (१२ वी) परीक्षा उत्तीर्ण झालेला असला पाहिजे.

नासिक बोर्ड व महाराष्ट्रातील इतर बोर्डाची १२ वी ची परीक्षा जे विद्यार्थी बहिस्थ/१७ नंबरचा फार्म भरुन उत्तीर्ण झाले आहेत त्यांना एफ.वाय.बी.ए. /एफ.वाय.बी.एस्सी. या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल.

**२) प्रक्रिया :**

१२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आत (प्रवेश जाहीरात व सुचना फलकावरील सुचना पाहावी) विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ह्या माहिति पुस्तिकेचे अवलोकन करुन प्रवेश अर्ज ऑनलाईन स्वरुपात भरावयाचा आहे. http://www.ascbhalod.ac.in/ **या महाविद्यालयाच्या वेब साईट लिंक ला क्लिक करुन** Admissions 2022-23 **वर क्लिक करुन स्वत:च्या ई–मेल व मोबाईल नंबर ने रजिस्ट्रेशन करावे व ऑनलाईन अर्ज अचुकप्रमाणे भरावा.** विद्यार्थ्याने त्याचा ऑनलाईन प्रवेश अर्ज मान्य झाल्यानंतर प्रवेश फी ऑनलाईन स्वरुपातच भरावयाची आहे. प्रवेश फी भरल्यानंतर ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रत खालील आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयामध्ये जमा केल्याशिवाय प्रवेश निश्चीत होणार नाही. याची नोंद घ्यावी.

**१) मूळ लिव्हींग सर्टिफिकेट व त्याच्या दोन झेरॉक्स् सत्यप्रती**
**२) १२ वी/डी.एड./अभियांत्रिकी डिप्लोमाचे मुळ गुणपत्रक व त्याच्या दोन झेरॉक्स् सत्यप्रती.**
**३) १० वी च्या परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र दोन झेरॉक्स प्रती.**
**४) जातीच्या दाखल्याच्या दोन झेरॉक्स् सत्यप्रती**
**५) आधारकार्ड च्या दोन झेरॉक्स प्रती, कार्यान्वीत मोबाईल नंबर व ई.मेल आय.डी.**
**६) २ पासपोर्ट साइजचे नवीन काढलेले कलर फोटो.**
**७) मतदान कार्ड च्या दोन झेरॉक्स प्रती**
**८) पालकांचा सन २०२१–२२ चा मा. तहसिलदार यांनी दिलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या दोन झेरॉक्स प्रती.**
**९) शैक्षणिक गॅप असल्यास गॅप सर्टिफिकेट व झेरॉक्स.**

**टिप:– लिव्हींग सर्टिफिकेट व गुणपत्रकाच्या अतिरिक्त झेरॉक्स प्रती प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:जवळ काढाव्यात.**

**व्दितीय वर्ष/तृतीय वर्ष बी.ए./बी.एस्सी. :**

१) एस.वाय. व टी.वाय बी.ए./बी.एस्सी. या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्या आधीच्या वर्गाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत आपले प्रवेश अर्ज महाविद्यालयात दाखल करुन फी सह प्रवेश घेणे आवश्यक आहे. एस.वाय च्या प्रवेशासाठी एफ.वाय. च्या गुणपत्रकांची झेरॉक्स् सत्यप्रती अर्जासोबत जोडावी. टी.वाय. च्या प्रवेशासाठी एफ.वाय व एस.वाय. च्या सर्व गुणपत्रकांच्या झेरॉक्स् सत्यप्रती जोडाव्यात.

२) अध्यादेश ६७ नुसार प्रथम वर्ष वर्गात प्रथम प्रवेश घेतलेपासून सहा वर्ष पूर्ण होत असतील अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही.

३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी नूतनीकरण अर्ज सादर करावा.